# फ्रांस व ब्रिटन

चंद्रशेखर पुरंदरे

**फ्रांस** : फ्रांसमध्ये मे २०१७ला अध्यक्षीय निवडणुकीत एमानुएल मॅक्रोन हा अध्यक्ष झाला. प्रस्थापित पक्ष सामान्य माणसाच्या गरजांकडे दुर्लक्ष करत आलेले आहेत या मुद्यावर त्याने नवीन पक्ष स्थापला व थोड्या मताधिक्याने तो निवडूनही आला.

मुख्यत: तो निवडून आला तो शहरी मतदारांच्या पाठिंब्यावर.ग्रामीण मतदारांनी अति-उजव्या (गोरे श्रेष्ठ) किंवा अति-डाव्या (भांडवलशाही उलथा) या पक्षांना जास्त करून मते दिली किंवा मतदान केलेच नाही.

ग्रामीण भागाचे जीवनमान खालावत आहे, सरकारला, बँकांना, व्यवस्थेच्या कोणत्याच संस्थेला त्याची पर्वा नाही हा संताप अनेक वर्षे खदखदत आला आहे. (फ्रांसचे हे विभाजन आपल्याकडेही दिसते.) त्यात तेथील एक वैशिष्ट्य म्हणजे खेड्यातला माणूस नोकरीसाठी मोटारगाडीवर अवलंबून असतो. डिझेलवरचा कर जानेवारीपासून आणखी वाढवण्याचा सरकारने प्रस्ताव मांडल्यानंतर या संतापाचा उद्रेक झाला. हजारोंनी अनेक शहरी गरीब, ग्रामीण गरीब शहरांमधील रस्त्यांवर १७ नोव्हेंबरपासून निषेधासाठी आले. त्यांनी दर शनिवार-रविवारी ही निदर्शने करण्याचे जाहीर केले. त्यानुसार १५-१६ डिसेंबरला सततचा पाचवा निषेध झाला.

दुसऱ्या निदर्शनापासून चळवळीत अराजक-वादी व विध्वंसक मंडळींचाही शिरकाव झाला. पॅरिस या राजधानीत मोठ्या प्रमाणावर नासधूस झाली. मालमत्तेची व गाड्यांची जाळपोळ, बँकांची दारे फोडणे, विलासी वस्तू विकणाऱ्या दुकानांची तोडफोड असे प्रकार झाले. पोलीस विरुद्ध निदर्शक यांच्यात झटापटी झाल्या, काही मृत्यू व शेकड्यात लोकांना अटकाही झाल्या. कायदा सुरक्षा कोलमडली. मग डिझेलचा प्रस्तावित कर सरकारने पुढे ढकलला. पण या दरम्यान विरोधकांच्या मागण्याही वाढल्या - अति-श्रीमंतावरील कर वाढवा, नोकऱ्या द्या, बेरोजगारी भत्ता वाढवा, किमान वेतन वाढवा. निवृत्तिवेतनावरील कर रद्द किंवा कमी करा इथपासून मॅक्रोनने राजीनामा द्यावा इथपर्यंत आज मागण्या आहेत.

ही चळवळ उत्स्फूर्त, खऱ्या अर्थाने तळा-गाळातून आलेली दिसते. (जरी हा वाक्प्रचार एव्हाना गुळगुळीत झालेला असला तरी.) तिचे साधर्म्य काहीकाळापूर्वी उदयाला आलेल्या 'Occupy Wall Street या चळवळीशी आहे. ही चळवळ 'आमची' असा दावा करण्याचा डाव्या आणि अति-उजव्या पक्षांचा प्रयत्न असफलझाला. चळवळीला रूढ नेतृत्व नाही व आदर्शवादही स्पष्ट नाही. त्यामुळे वाटाघाटी करणार कोणाशी आणि काय काय मुद्यांवर हा सरकारला प्रश्न आहे. आजवर कामगार संघटना, राजकीय पक्ष, शोषितांच्या संघटना, इत्यादि त्या त्या गटांचे वकील असत, ते इथे नाही. थोडक्यात हा व्यवस्थेविरुद्धचा सर्वहारांचा व्यापक असंतोष आहे.

**ब्रिटन :** युरोपिअन युनिअन ही युरोपातील २८ देशांची संघटना आहे. परस्पर व्यापार सुलभ व्हावा, नागरिकांना युनियनमधील इतर देशात स्थलांतरित व्हायला मुभा असावी, मालाची अंतर्गत आयात निर्यात सोपी व्हावी, युनिअन हा भांडवलशाही लोकशाही देशांचा एक गट असावा ज्यायोगे उर्वरित जगाशी तो एकमुखाने व्यवहार करू शकेल इत्यादि उद्दिष्टांसाठी युनिअन स्थापन झाली. तिचे मुख्य कार्यालय ब्रसेल्स या बेल्जीयम देशाच्या राजधानीत आहे. तेथे प्रचंड नोकरशाही सभासद देशांच्या खर्चाने

चालते. युनिअनची संसदही आहे. तिच्यात सभासद देशांचे खासदार असतात. या देशांच्या स्वत:च्या कायद्यावर, अर्थकारणावर युनिअनचे नियंत्रण असते.

गेल्या काही वर्षांत ब्रिटनमध्ये राष्ट्रवादी उजव्या शक्तींचा उदय झाला. त्यांनी युनिअनविरोधी भूमिका घेतली.

तिला लोकांचा पाठिंबाही मिळू लागला. त्याची सगळीच कारणे युनिअन संबंधात नव्हती. वंशद्वेष, देशांतर्गत आर्थिक असंतोष, परकीयांनी ब्रिटनमध्ये स्थायिक होणे नामंजूर, जागतिकीकरणाला विरोध, सांस्कृतिक अस्मिता वगैरे अनेक घटक त्यामागे एकत्र आले.

यांनी एक पक्षही स्थापन केला. त्या पक्षाचा एक-कलमी कार्यक्रम म्हणजे ब्रिटनने युनिअनमधून बाहेर पडावे. युनिअनमुळे आपल्या देशाची लूट होत आहे, आपण आपले सार्वभौमत्व गमावले आहे, ब्रसेल्सला जाणारा पैसा आपल्या देशात खर्च केला तर आपली राष्ट्रीय आरोग्यसेवा सुधारेल, सार्वजनिक वाहतूक सुधारेल, पूर्व युरपिअन स्थलांतरितांमुळे आपल्या लोकांना नोकऱ्या मिळत नाहीत, वगैरे. यातील कोणत्याच दाव्यात फारसे तथ्य नव्हते. पण तो अपप्रचार लोकांच्या गळी पाडण्यात ही मंडळी यशस्वी झाली. त्याचा परिणाम म्हणजे या एका मुद्यावर अडीच वर्षांपूर्वी सार्वमत घेण्यात आले. त्यात ५२ टक्के लोकांनी युनिअनमधून बाहेर पडावे असा कौल दिला. (म्हणजे बहुमत जेमतेम होते.) या मताला Brexit म्हणतात म्हणजे Britain's Exit. हा निर्णय सार्वमत घेणाऱ्या पंतप्रधानाला अगदी अनपेक्षित होता. त्यामुळे त्याने तातडीने राजीनामा दिला व तेरेसा मे पंतप्रधान झाल्या.

ब्रिटनचा हा निर्णय युनिअनला कळवण्यात आला. युनिअनमधून बाहेर पडणे ही प्रक्रिया आहे. अनेक कायदे, मालाची आयात-निर्यात, ब्रिटनमधल्या युरोपिअन नागरिकांचे हक्क, जगातील इतर देशांशी व्यापार अशा अनेक गोष्टी त्यात गुंतलेल्या आहेत. शिवाय, ब्रिटन हा चार प्रमुख प्रदेशांचा देश आहे. वेल्स, इंग्लंड, स्कॉटलंड आणि उत्तर आयर्लंड. त्यातील स्कॉटलँडचा ब्रिटनपासून विभक्त होऊन आपला स्वतंत्र देश स्थापावा असा जुना प्रयत्न आहे. त्यांनी ब्रिटनमधून बाहेर पडायला हरकत नाही पण आम्हाला युनिअनमध्ये रहायचे आहे, हे स्पष्ट केले. म्हणजे ब्रिटनची शकले हा एक संभाव्य परिणाम आहे. खेरीज उत्तर आयर्लंड हा ब्रिटनचा भाग तर आयर्लंड हा त्याला लागून असणारा स्वतंत्र देश. त्यांच्यातील सीमा हा व्यापार, लोकांची ये-जा या दृष्टीने आणखी एक विवाद्य मुद्दा आहे कारण आयर्लंड देश युनिअनचा सभासद आहे.

युनिअनबरोबरच्या वाटाघाटींचा घोळ गेले वीस महिने चालू आहे. त्याचे निष्पन्न म्हणजे एक ५८५ पानांचा करार आता पुढे आला आहे मेबाईंच्या मते हा उत्तम करार आहे आणि त्यानुसार ब्रिटनने पुढच्या वर्षीच्या २९ मार्चला युनिअन सोडावी. मात्र, त्यांच्याच पक्षातील अनेक खासदारांना हा करार मान्य नाही कारण त्यातील तरतुदी त्यांच्या मते ब्रिटनला जाचक आहेत. विरोधी मजूर पक्षालाही तो मान्य नाही! म्हणजे Brexit चे बरेच समर्थक आणि विरोधक खासदार विरोधात आहेत. त्यामुळे कराराला आवश्यक असणारी ब्रिटिश संसदेची मान्यता मिळणे आज अशक्य आहे. युनिअनने करारात काहीही बदल होणार नाही असे वारंवार स्पष्ट केले आहे.

या पेचाला एक तोडगा म्हणजे, ब्रिटनने ही मागणीच मागे घेणे व युनिअनमध्ये रहाणे. किंवा खासदारांना न जुमानता दुसरे सार्वमत घेणे व अडीच वर्षात लोकमत बदलले आहे का हे पहाणे. पण बाई हटून बसल्या आहेत. त्यांच्या मते हा करार न केल्यास ब्रिटनला करार न होता युनिअनमधून बाहेर पडावे लागेल. त्याचे परिणाम तर अकल्पनीय आहेत व होतील. न-करार या पर्यायाने संभाव्य सामाजिक असंतोषाला सामोरे जाण्यासाठी साडेतीन हजार सैनिक तैनात केले जातील.

दरम्यान लंडन हे जागतिक आर्थिक केंद्र रहाणे कठीण दिसते. अनेक बँकांनी, उद्योगांनी ब्रिटन सोडण्याची कारवाई सुरु केली आहे. अनेकांचे रोजगार धोक्यात आहेत. उर्वरित युरोपातून येणाऱ्या बऱ्याच जीवनावश्यक वस्तू महाग होणे, घरांच्या किमती कोसळणे शक्य आहे. या अनिश्चित वातावरणाने देशांतर्गत अनेक धोरणेही ठप्प झाली आहेत. ब्रिटनच्या तथा-कथित प्रौढ आणि सूज्ञ लोकशाहीचे हे आजचे चित्र आहे.

तात्पर्य, फ्रांसमध्ये दृश्य तर ब्रिटनमध्ये अदृश्य अराजक आहे.

(मागील लेखात उल्लेख केलेल्या महिन्द राजपक्ष या श्रीलंकेच्या पंतप्रधानाने दरम्यान राजीनामा दिला.)

www.art-non-deco.com
artnondeco@yahoo.co.uk